दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२९७ ■ मंगळवार, दि. १८ फेब्रुवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -297 ■ Tuesday, 18 Feb 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

# क्रांतीचौकात शिवरायांचे बालपण वाचून विद्यार्थी हरखून गेले

## क्रांती चौकात शिवचरित्र पारायण सोहळ्यात पाचव्या दिवशीही उत्साह





आज पाचवा दिवस छत्रपती शिवचरित्र पारायणाचे 'छत्रपती कोणाचे ग्रंथाचे' वाचन करुन पोलीस आयुक्त श्री. प्रविण कुमार पवार साहेबांनी केले व शुभेच्छा दिल्या. आज छत्रपती संभाजीनगरचे खासदार श्री.संदिपानजी भुमरे साहेब, मराठवाडा शिक्षक आमदार श्री. विक्रमजी काळे साहेब, जिल्हा दुध संघांचे आध्यक्ष श्री. नंदलाल काळे, एसीपी. धनंजय पाटील,उद्योजक शरद देशमुख, कॉंग्रेसचे शहराध्क्ष इब्राहिम पठाण, आदि हजारो शिवप्रेमी सहभागी झाले होते. तसेच वेगवेगळ्या शाळेचे दिड हजार विद्यार्थी सहभागी झाले होते.

**दिनेश परदेशी**
**(अट्टल संकेत विशेष प्रतिनिधी)**

क्रांती चौकात विविध शाळांमधील बाल शिवप्रेमींकडून शिवरायांच्या चरित्राचे पारायण सुरू आहे. यात शिवरायांचे बालपण, स्वराज्यनिर्मितीचे कार्य, शिवरायांची युद्धनीती याचे वाचन करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, सर्वधर्मीय, सर्वजातीय बालशिवप्रेमी विद्यार्थी या सप्ताहात सहभागी झाले असून, पाचव्या दिवशी शिवरायांचे बालपण वाचून विद्यार्थी हरखून गेल्याचे चित्र पाहावयास मिळाले. उपक्रमाचे कौतुक येथे आलेल्या अनेक नागरिकांनी ब ोलून दाखवले.पाच दिवसांपर्यंत या सप्ताहात खासदार संदीपान भुमरे, आमदार विक्रम काळे, पोलिस आयुक्त प्रवीण पवार, सहायक आयुक्त धनंजय पाटील यांनी भेटी दिल्या. मागील आठ वर्षांपासून या पारायण सोहळ्याचा यज्ञ तेवत ठेवला जात आहे. याचे कौतुक ही मान्यवरांकडून करण्यात आले. यावेळी बालकांसाठी अल्पोपहाराची व्यवस्थाही करण्यात आली होती. येणाऱ्या प्रत्येकाचे आधारतिथ्य भराट यांनी केले. सध्याची परिस्थिती पाहता जाती जातीत भेदभाव ज्येष्ठ, कनिष्ठ असे चालू असताना मात्र दुसरीकडे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त क्रांतीचौकात चालू असलेला हा उपक्रम अभिनव आहे. शिवचरित्र पारायण सोहळ्याचे उद्घाटन सर्वधर्मीय ग्रंथदिंडीने करण्यात आले. यात आतापर्यंत मराठी, इंग्रजी, उर्दू व सर्व माध्यम ांच्या पाच हजारांहून अधिक शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. १४ फेब्रुवारीला शहरातील विविध शाळांच्या परिसरात किल्ले बनवा स्पर्धा, १५ फेब्रुवारीला क्रांती चौक येथून महापुरुषांच्या पुतळ्यांची साफसफाई अभियान राबवून अभिवादन करण्यात आले. १६ फेब्रुवारीला शालेय स्तरावर चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. १७ फेब्रुवारीला सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले, असे सप्ताह समितीचे आयोजक प्रा. चंद्रकांत भराट यांनी दै. अट्टल संकेतशी बोलताना सांगितले.

**शौर्य गीत, तसेच शिवस्फूर्ती गीते सादर –** पारायणस्थळी वाचन व शौर्य गीत, तसेच शिवस्फूर्ती गीते सादर करण्यात आली. संत कबीर शाळेच्या विद्यार्थ्यांनी कोंढाण्याचा रणसंग्राम 'गड आला पण सिंह गेला' यावर सुंदर नाट्य सादर केले. नारेगावातील अंजुमन उर्दू हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय एकात्मता, हिंदू-मुस्लिम भाई भाई, हे नाट्य सादर केले.

सोमवारी (ता. १७) पारायणात बाराशे विद्यार्थ्यांचा सहभाग होता. दररोज सकाळी साडेआठ ते साडेअकरा या वेळेत हे पारायण होत आहे. यावेळी सुरेश वाकडे, प्रा. मिर्झा सलीम बेग, इब्राहिम पठाण, रवींद्र नीळ, श्रीमती जगताप, प्रा. मन्सूर शेख, कृष्णा भराट, शिवम भराट, प्रसाद भागिले, शाहीर कमलाकर साबळे, शाहीर दहिवाल यांच्यासह विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकांची उपस्थिती होती.



विद्यार्थी दशेपासूनच 'सर्वधर्म समभाव' ही भावना रुजण्यास या पारायणाच्या माध्यमातून मदत होत आहे. मागील आठ वर्षांत तब्बल ४५ हजार विद्यार्थ्यांनी शिवचरित्र पारायणात सहभाग नोंदविला आहे.या उपक्रमाच्या माध्यमातून सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला जात आहे.

**– प्रा. चंद्रकांत भराट**
मुख्य संयोजक, छत्रपती शिवचरित्र पारायण समिती

# माजी आमदार हर्षवर्धन जाधवांना अटक

**नागपूर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांना सोनेगाव पोलिसांनी न्यायालयाच्या आदेशानुसार सोमवारी (ता. १७) सायंकाळच्या सुमारास अटक केली. त्यांना कारागृहात नेत असताना, त्यांची अचानक तब्येत बिघडल्याने त्यांना इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात (मेयो) दाखल करण्यात आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २०१४ साली पोलिस निरीक्षक पराग जाधव यांना मारहाण केल्याप्रकरणात सत्र न्यायालयाने आम दार हर्षवर्धन जाधव यांचा अटकपूर्व जामीन कायम केला. १७ डिसेंबर २०१४ ला हिवाळी अधिवेशनादरम्यान १७ डिसेंबरला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची हॉटेल प्राइडमध्ये ज्येष्ठ नेत्यांसोबत बैठक सुरू असताना, तिथे कुणालाही येऊ न देण्याचे आदेश होते. यावेळी हर्षवर्धन जाधव तिथे आले. त्यांना आतमध्ये जाण्यास सुरक्षेसाठी तैनात विशेष सुरक्षा पथकाचे पोलिस निरीक्षक पराग जाधव यांनी असलेल्या आदेशानुसार मनाई केली होती. यावेळी बैठकीत जाण्यासाठी ना. दिवाकर रावते व तत्कालिन मंत्री एकनाथ शिंदे तिथे आले. त्यांना नेण्यासाठी बैठकीतून पर्यावरण मंत्री रामदास कदम सुट बाहेर आले. त्यांनी दोघांनाही सुटमध्ये नेले. मात्र, तत्कालिन आमदार हर्षवर्धन जाधव यांना मनाई करण्यात आल्याने त्यांनी आरडा-ओरड करीत आत जाण्याचा प्रयत्न केला. पराग जाधव यांनी त्यांना आत सोडले नाही. पुन्हा आरडाओरड करुन आमदार जाधव यांनी पराग जाधव यांच्या कानशिलात लगावली. त्यानंतर ते तेथून बेपत्ता झाले होते. याप्रकरणी पराग जाधव यांनी सोनेगाव पोलिसांना दिलेल्या तक्रारीवरून आमदार जाधव यांच्याविरुद्ध शासकीय कामात अडथळा व मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. सुनावणीदरम्यान याप्रकरणात आमदार जाधव यांना तात्पुरता अटकपूर्व जामीन देण्यात आला होता.

# डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना;प्रस्ताव मागविले

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

अल्पसंख्याक विकास विभागातर्फे डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत अनुदान मिळवू इच्छिणाऱ्या मदरसांनी दि.२२ पर्यंत आपले प्रस्ताव सादर करावे असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ यांनी केले आहे. प्रस्ताव दाखल करण्याकरीता योजनेचा शासन निर्णय व आवश्यक कागदपत्रांची यादी htts:mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक व पात्र मदरसा चालकांनी मदरसांचे परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय येथे दि.२२ पर्यंत सादर करावे, विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ यांनी केले आहे.

## शिवजन्मोत्सव समिती २०२५ च्या शिवजन्मोत्सवाची सुरुवात




शिवजन्मोत्सव समिती २०२५ च्या शिवजन्मोत्सवाची सुरुवात भगवानबाबा बालिका आश्रम,बीड बायपास छत्रपती संभाजीनगर येथील बालकांना समितीच्या वतीने प्रीतीभोजन देऊन करण्यात आली. यावेळी समितीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. गेल्या २२ वर्षांपासून अनाथांचा सांभाळ करून त्यांना घडविणाऱ्या कविताताई आपल्या कार्याचे कौतुक ही समिती कडून करण्यात आले.

# झिरो प्रिस्क्रिप्शनची पुन्हा आयुक्तांनी केली वाच्यता, पण निधीची तरतूदच नाही!

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महापालिका रुग्णालयांमध्ये झिरो प्रिस्क्रिप्शन धोरण लागू करण्याचे निर्दे श तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंद यांनी दिल्यानंतर महापालिका प्रशासनाने चालू आर्थिक वर्षात तब्बल २ हजार कोटी रुपमांची तरतूद केली. परंतु आगामी आर्थिक वर्षांत या धोरणाबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासकांनी वाच्यता करत विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंद यांचा मान राखण्यासाठी प्रयत्न केला असला तरी प्रत्यक्षात यासाठीच्या निधीची स्वतंत्र तरतूदच करण्यात आली नसल्याची बाब समोर येत आहे.

महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये झिरो प्रिस्क्रिप्शन धोरण राबविण्यासाठी सन २०२४-२५मध्ये सुमारे २ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्याद्वारे रुग्णांना निःशुल्क औषधी उपलब्ध करून दिली जातील. आरोग्य सुविधेसाठी इतका मोठा निधी खर्च करणारी मुंबई महानगरपालिका ही देशातील एकमेव महानगरपालिका आहे, अशा शब्दांत तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १५ १०४ मार्च २० २४ रोजी नावर रुग्णालय दंत महाविद्यालयाच्या विस्तारित नवीन इमारतीच्या लोकार्पणप्रसंगी गौरवोद्गार काढले होते. एकनाथ शिंदे मांच्या मागणीनुसारच महापालिका रुग्णालयात झिरो प्रिस्क्रिप्फान घोरण लागू करण्यासाठी महापालिका प्रशासन प्रयत्नशीर होत आणि त्यासाठीची निविदा प्रक्रियाही सुरू केली होती.

परंतु याबाबतची निविदा प्रक्रिया अद्यापही अंतिम झालेली नसून याअंतर्गत करण्यात येणारी औषधेच निविदेत अडकली आहेत, नोव्हेंबर २०२३ मध्ये मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी के. ई. एम रुग्णालयाला भेट दिली होती, त्यावेळी रुग्ण व नागरिकांशी झालेल्या चर्चे दरम्यान त्यांना काही त्रुटी निदर्शनास आल्या होत्या, महानगरपालिका रुग्णालयात उपलब्ध औषधे व संसाधनांव्यतिरिक्त नातेवाईकांमार्फत रुग्णांच्या उपचारासाठी खर्च केला जातो. गरीब रुग्णांवर या खर्चाचा अतिरिक्त बोजा पडतो. गरीब रुग्णांना महापालिकेच्या रुग्णालयांमार्फत निःशुल्क सेवा उपलब्ध व्हावी यासाठी 'झिरो प्रिस्क्रिपशन पॉलिसी' राबविण्याबाबत त्यांनी त्यावेळी महापालिकेला निर्दे श दिले होते. परंतु आता राज्याच्या मुख्यमंत्री पदावरून पायउतार होत उपमुख्यमंत्री बनलेल्या शिंदे यांच्या या संकल्पनेचा समावेश महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ भूषण गगराणी यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात केला असला तरी प्रत्यक्षात यासाठीच्या निधीची तरतूदच केली नसल्याची बाब समोर येत आहे. महापालिकेच्या विविध रुग्णालयांच्यावतीने खरेदी करण्यात येणाऱ्या औषधांसाठी निधीची तरतूद असली तरी झिरो प्रिस्किप्पान धोरणाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र तरतूद आगामी अर्थसंकल्पात नसल्याचे दिसून येत आहे.

# सुजय उज्जैनकर सरांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा



**गंगापुर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गंगापूर पंचायत समितीचे घरकुल विभागाचे कक्ष प्रमुख सुजय उज्जैनकर सर यांच्या कार्यालयामध्ये शाल श्रीफळ देऊन केक कापून जन्म वाढदिवस साजरा करण्यात आला.

त्यावेळेस अॅड – रामनाथ पारखे, आकाश पारखे, निलेश पारखे, , अभिजित पारखे, संतोष पंडित, नितीन पारखे , अरुण शिरसाठ सर, चंद्रकांत सोनवणे, पोपट गायकवाड सर , मंगेश भागवत या सर्वांनी उज्जैनकर सरांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या .

# कार्यकर्त्यांच्या सन्मानासाठी खिशात पेन आणि हातात लाठी लो अभियान प्रारंभ- नारायण बागडे !



**नागपूर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

अन्याय अत्याचाराच्या विरोधात कार्यकर्त्यांना आपल्या जिवाची बाजी लावा लागते त्यांच्या कोणी वाली नसतो याचा अर्थ हे होते नाही कि तो चुप्पी साधेल काही मस्तावले राजकीय लोक आपले किंवा दुसरे हे कार्यकर्त्यांना अपमानास्पद वागणूक देण्यासाठी मागे पुढे पाहत नाहीत अशा लोकांना वठणीवर आणण्यासाठी खिशात पेन आणि हातात लठ घेण्याची आवश्यकता आहे असे प्रतिपादन आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी केले ते वस्ताद लहूजी साळवे यांच्या जयंतीनिमित्त सदर अभियानाचे प्रारंभ करतांना अंबाझरी उद्यान येथिल त्यांच्या पुतळ्याला अभिवादन करताना बोलत होते या प्रसंगी मोठ्या संख्येने लहूजी आखाड्यातील कार्यकर्त्यांनी हा संकल्प केला आहे.

# वेरूळ येथे संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांची जयंती उत्साहात साजरी



**खुलताबाद**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

प्रतिनिधी खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथे श्री संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांची ६४८ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली असुन दि. १५ शनिवारी सकाळी भव्य मिरवणूक संत शिरोमणी गुरू रविदास संस्थान येथुन वेरूळ गावात भव्य मिरवणूक काढण्यात आली.

या मिरवणुकीत छत्रपती संभाजीनगर, जालना, अहिल्यानगर, नाशिक, मनम ाड,पैठण, गंगापूर, कन्नड, खुलताबाद, फुलंब्री. इतर तालुक्यातुन मोठ्या संख्येने चर्मकार समाज बांधव व महिला या श्री संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांची जयंती उत्साहात मिरवणूक सहभागी झाले होते.

श्री संत शिरोमणी गुरू रविदास महाराज संस्थान यांच्या समाजमंदिरात मिरवणूकीचे समारोप करण्यात आले. यावेळेस आ. नारायण कुचे. एसीपी बालाजी सोनटक्के,जिल्हा सचिव प्रकाश पाटील वाकळे,सरपंच प्रकाश नाना मिसाळ. उपसरपंच विजय भाऊ राठोड. तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे. माजी नगरसेवक योगेश बारगळ, माजी उप सभापती दिनेश अंभोरे, शिवसेना माजी तालुकाप्रमुख किशोर बापु कुकलारे, टाकळी येथील सरपंच मुस्ताक पटेल, सोसायटीचे डायरेक्ट कृष्णापाटील भागडे, वेरूळ येथील पोलीस पाटील रमेश ढिवरे,व विविध पक्षांचे पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक या जयंती उत्साहात सहभागी झाले होते.

यावेळी संस्थानच्या वतीने विविध गावातुन आलेल्या भजनी मंडळास प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी श्री संत शिरोमणी गुरू रविदास महाराज उत्सव समिती अध्यक्ष गुलाब हरीलाल कुचे, सचिव दिपक धोंडीराम भगुरे, उपाध्यक्ष मोतीराम श्रावणे, ईश्वर पसे कोषाध्यक्ष धोंडीराम रईवाले, प्रसिध्दी प्रमुख किशोर पुसे, सदस्य राजु बिरसणे, रामलाल निंभोरे, भाऊसाहेब पुसे, अमोल रईवाले, कैलास निंभोरे, महेश पंढरे,संतोष धनतोले, कडुनाथ विटोरे बाळु पल्हाटे, संतोष भेंडे ,रमेश विटोरे , कैलास पुसे, रोहीदास शिखरे,ताराचंद फुलमाळी,संजय पुसे,रमेश कुंचे ,किशोर कुचे, संतोष बरथरे,म ोहन पुसे,रमेश निंभोरे,संजय चिकसे,गोपाल बीरसोने, काय गावचे भावलाल चरबरे , प्रकाश फतपुरे , राजु बर्हानपुरे,

यावेळी खालील मान्यवर उपस्थित होते संस्थानचे अध्यक्ष लक्ष्मण गरोठे, सचिव देवलाल भगुरे,संचालक कन्हैयालाल निंभोरे, धोंडीराम पुसे, शिवलाल भेंडे, रामदास भगुरे, सुखलाल गहेराव, रमेश डोंगरे, हिरालाल काठोटे, संजय चिक्से, गोपाल बिरसोने, गणेश पुसे, भाऊलाल निंभोरे व मोठ्या संख्येने चर्मकार समाज बांधव व महिला उपस्थित होते.

## भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री ना.श्री.चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांच्या शुभहस्ते आ. अनुराधाताई चव्हाण यांच्या मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयाचा भव्य शुभारंभ

# नागरिकांच्या समस्या निवारण करण्यासाठी या कार्यालयाचा निश्चित उपयोग होईल-महसूल मंत्री ना.श्री.चंद्रशेखर बावनकुळे





**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री ना.श्री.चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांच्या शुभहस्ते आमदार अनुराधाताई चव्हाण यांच्या मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयाचा भव्य शुभारंभ सोहळा संपन्न झाला. कमीत कमी वेळेत नागरिकांच्या समस्या निवारण करण्यासाठी या कार्यालयाचा निश्चित उपयोग होईल. या कार्यक्रमास असंख्य नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसादरुपी आशीर्वाद अत्यंत ऊर्जादायी ठरला.

या कार्यक्रमाला अनेक महनीय मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. भाजपा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आमदार श्री.रवींद्र चव्हाण साहेब, मा.केंद्रीय राज्यमंत्री श्री.रावसाहेब दादा दानवे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री ना.श्री.अतुल सावे साहेब, आमदार श्री.नारायणभाऊ कुचे, आमदार श्री.शांताराम बापू पाटोळे, आमदार श्री.विक्रांतजी पाटील, केंद्रीय सहसंपर्क प्रमुख श्री.चंद्रकांत खोतकर, प्रदेश उपाध्यक्ष श्री.चंद्रशेखर केकाणे, भाजपा ग्रामीण उत्तर प्रदेश कार्याध्यक्ष श्री.हिम्मतराव ढिकले, भाजपा जिल्हाध्यक्ष श्री.सांडूभाऊ जगधने, भाजपा जिल्हाध्यक्ष श्री.शंकरजी राजूरकर यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते या प्रसंगी सहभागी झाले होते.

कार्यालय स्थळ – कॅनॉट गार्डन, बुलेट शोरूमच्या मागे, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे स्थापित हे जनसंपर्क कार्यालय नागरिकांसाठी कायम खुले राहील आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी तत्पर असेल.या कार्यालयाच्या माध्यमातून समर्पित कार्यास अधिक वेग प्राप्त होईल असा विश्वास चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. आलेल्या प्रत्येक व्यक्तीला १ ग्लास पाणी, १ ग्लास चहा, व १ पत्र कामासाठी पत्र, व १ फोन महत्त्वाचा आहे.

सर्वच कामे होतील असे नाही. परंतु आमदारांकडून मात्र आलेल्या व्यक्तीसाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे असेही चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

# प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० विभागस्तरीय प्रशिक्षण प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशिक्षणाचा लाभ घ्या-विभागीय आयुक्त गावडे

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

विभागातील नागरी भागात प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करावयाची आहे. त्यासाठी हे प्रशिक्षण आयोजीत केले आहे. त्याचा यंत्रणेने लाभ घ्यावा. लोकांना परवडणारी घरे देण्याचे कार्य सुलभ व्हावे यासाठी हे प्रशिक्षण असून त्याचा लाभ घ्यावा, असे निर्देश विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० चे विभागस्तरीय- शहर्स्तरीय तांत्रिक तज्ज्ञ पायाभूत प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले. या प्रशिक्षणात विभागातील ५ महानगरपालिका व ७५ नगरपालिकांचे मुख्याधिकारी, अभियंते, आवास योजनेशी संबंधित तांत्रिक सल्लागार आदी सहभागी झाले आहेत.

जल्हाधिकारी दिलीप स्वामी यावेळी उपस्थित होते. प्रशिक्षक म्हणून गृहनिर्माण विभागाचे अवर सचिव रविंद्र खेतले, राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणेचे वरिष्ठ सल्लागार मुकुल बापट, राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन



यंत्रणेचे सल्लागार सारिम खान आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले की, प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी करतांना पहिल्या टप्प्यात ज्या अडचणी आल्या त्यावर उपाययोजना शोधाव्या यासाठी प्रशिक्षणाचे आयोजन आहे. त्याचा प्रत्येकाने लाभ घ्यावा.

तांत्रिक आणि प्रत्यक्ष अडचणींचे निराकरण होण्यासाठी प्रशिक्षणातून मार्गदर्शन घ्यावे. गोरगरिबांना स्वतःचे घर देण्यासाठी प्रत्येकाने संवेदनशिल, गतिमान पद्धतीने काम करावे.

या प्रशिक्षणात योजनेचा आढावा, प्रगती, निधी वितरण, अखर्चित निधी, जिओ टॅगिंग याबाबत रविंद्र खेतले, प्रधानमंत्रीआवास योजनेची ध्येय्य, उद्दिष्टे व अंमलबजावणी याबाबत मुकुल बापट , प्रधानमंत्री आवास योजनेचे युनिफाईड पोर्टल, ऑनलाईन अर्ज भरणे याबाबत सारिम खान हे मार्गदर्शन करणार आहेत.

# अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शाळांमध्ये पायाभुत सुविधा विकासासाठी अनुदान; प्रस्ताव मागविले

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खासगी अनुदानित, विना अनुदानित, कायम विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका, नगरपरिषद शाळा व अपंग शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. अल्पसंख्याक विकास विभागामार्फत ही योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत अनुदान मिळवू इच्छिणाऱ्या शाळांनी आपले प्रस्ताव दि.२२ फेब्रुवारी पर्यंत सादर करावे असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ यांनी केले आहे. प्रस्ताव सादर करण्याकरीता योजनेचा शासन निर्णय, अर्जाचा नमुना व आवश्यक कागदपत्रांची यादी htt{s:// mdd.maharashtara.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. पायाभुत सुविधांसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाची मर्यादा आता २ लाख रुपयांवरुन १० लाख रुपये इतकी वाढविण्यात आली आहे. यासंदर्भात यापूर्वी प्राप्त झालेले प्रस्ताव दि.१३ फेब्रुवारी २०२५ च्या परिपत्रकानुसार रद्द करण्यात आले आहेत. तरी पायाभूत सुविधांच्या विकासासाठी अटी व शर्ती नुसार पात्र शाळांनी परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, येथे दि.२२ पर्यंत सादर करावे. विहित मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी,असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ यांनी केले आहे.

# गल्ले बोरगांव येथील गाईच्या पोटातुन २५ किलो प्लास्टिक काढण्यात पशु वैद्यकीयांना यश



**खुलताबाद**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

तालुक्यातील गल्लेबोरगाव येथील शब्बीर शहा यांची गाय गेल्या एक महिन्यापासून आजारी होती तिच्या विविध तपासण्या केल्या नंतर रक्त तपासणी केल्या मात्र धातूशोधक यंत्राने तपासणी केली असता डॉ.प्रदीप मोराळे यांनी तिच्या पोटात प्लास्टिक व काही तार,खिळे वगैरे गेलं आहे असं निदान केलं. त्यानुसार शुक्रवारी (दि.१४) रुमीनटॉमी ही शस्त्रक्रिया करून गायीच्या पोटातून चक्क २५ किलो प्लास्टिक काढले व गायचे प्राण वाचवले.या शस्त्रक्रियेसाठी त्यांना डॉ.अर्जुन दोडके यांच्यासह खाजगी सेवा दाता तुषार काळे,करण चव्हाण यांनी मदत केली.

ग्रामीण भागातील पशुंमध्ये असे प्रकार वारंवार आढळुन येतात करीता गाईना आहारामध्ये खनिज मिश्रण,प्रथिने यांची कमतरता झाल्यास जनावरे असे उघड्यावरील प्लास्टिक इतर वस्तू खातात जेणेकरून जनावरांना असे गंभीर आजार होतात त्याकरिता सर्व पशुपालकांनी आपल्या जनावरांना रोज क्षार मिश्रण किंवा मिनरल मिक्सर त्यांच्या आहारातून द्यावे असे आवाहन डॉ.मोराळे पशुधन विकास अधिकारी खुलताबाद यांनी केलेले आहे.

# राजाबाजार जैन मंदिरात जैन समाजातील सी.ए.परिक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव व सत्कार समारंभ उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

श्री.खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार येथे नेहमी विविध धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व जनकल्याणकारी कार्यकमाचे आयोजन करण्यात येत असते. याच अनुषंगाने मंदिराच्या ४६ वा वर्धापनदिनाचे औचित्य साधुन एका छोटेखानी कार्यकमा शिखर मंदिर परिसरात खंडेलवाल दिगंबर जैन समाजातील सी.ए.परिक्षा उत्त्तीर्ण झालेल्या विदयार्थी व विदयार्थीनींचा स्मृतिचिन्ह व शाल श्रीफळ देउफ्न यथोचित सन्मान करण्यात आला. या कार्यकम ाच्या अध्यक्षस्थानी उच्च न्यायालयाचे न्या. संजयजी गंगापुरवाला यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख अतिथी म्हणुन मुंबई उच्च न्यायालयाचे म ाजी न्या.के.यु.चांदीवाल, मध्य विधानसभा मतदार संघाचे आ.प्रदिप जैस्वाल, सी.ए.असोशिएशनच्या अध्यक्ष रफ्पाली अभिजीत बोथरा, उपाध्यक्ष अमोल प्रकाश गोधा अशोक अजमेरा हेमंत बाकलीवाल विजय चादीवाल राजकुमार पाडे सुनिल सुदरलाल पाटनी यांचीही प्रमुख उपस्थिती होती. सर्व प्रथम उपस्थित अतिथीच्या वतीने भगवान शांतीनाथांच्या फोटोला पुष्पअर्पण करफ्न दिप प्रज्वलन करण्यात आले. तसेच कार्यकमाचे मंगलाचरण नमोकार भक्ती मंडळाच्या वतीने करण्यात आले. कार्यकमाचे प्रास्ताविक पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी यांनी केले तर सुत्रसंचालन सचिव प्रकाश अजमेरा यांनी केले.

यावेळी दोन्हीही न्यायमुर्ती यांनी सी.ए.परिक्षा उत्त्तीर्ण झालेल्या विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले व सतत नेहमी आपल्या शिक्षणाकडे दयावे त्याचबरोबर सामाजिक व धार्मिक कार्यकमातही आपला सहभाग नोंदवावा. तसेच विद्यार्थ्यांनी स्वतहाचे ध्येय ठरवुन झपाटुन अभ्यास केला पाहिजे जिवंत असेपर्यत ज्ञानार्जन करत राहिले पाहिजे. काहीही सहजा सहजी मिळत नाही. त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जिदद व चिकाटाचे ध्येय गाठण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे असे सांगु त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी सी.ए.रौनक शैलेश चांदीवाल, आयुषी संदीप बिनायके, अक्षय वर्धमान काला, महिला शैलेश चांदीवाल, अभिजीत पवन रावका, मानव कमल कासलीवाल, काजल वर्धमान कासलीवाल, जैनम निलेश दगडे, वृषभ प्रविण गंगवाल, यशिता नरेंद्र कासलीवाल, ऐश्श्वर्या जितेंद्र अजमेरा, श्रेया संजय सेठी, प्रतिक्षा अंकित अजमेरा, प्रतिष्ठा वर्धमान पाटणी, आस्था सुजीत कासलीवाल आदी सी.ए विदयार्थ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच जालना पंचायत समिती कार्यरत ज्युनिअर इंजिनियर प्रतिक्षा शांतीलालजी पाटणी यांचा व मंदिरास सतत सहयोग देणारे पाश्श्वनार्थ ज्वेलर्सचे संचालक निलेश कस्तुरचंद पाटणी यांचाही यावेळेस शाल व स्मृतिचिन्ह देवून यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी विश्वस्थ अरफ्ण पाटणी, अॅड.यतिन ठोले, किरण पहाडे, महावीर ठोले, जितेंद्र पाटणी, चंदा कासलीवाल, निता ठोले, संतोष सेठी आदीसह स्वस्तीगुप महिला मंडळ व समाज बांधवांनी मोठी उपस्थिती होती अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत फुलंब्री तालुक्यातील गावांचा होणार कायापालट..

## आमदार अनुराधाताई चव्हाण यांचा निर्धार

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

फुलंब्री मतदारसंघाचे आमदार अनुराधाताई चव्हाण यांनी विकास कामांचा धडाका लावला आहे. ज्या प्रमाणे मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी चंद्रशेखर बावनकुळे साहेबांनी सांगितले त्याच धर्ती वर त्यांचे कार्य चालू आहे. त्याचाच एक भाग म्हणून हा उपक्रम.

पाणी फाऊंडेशन आणि कृषी विभाग, फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने पोकरा प्रकल्पासाठी निवड झालेल्या २२ गावांच्या सरपंच व ग्राम विकास समितीची मार्गदर्शनपर कार्यशाळा तहसील सभागृह, फुलंब्री येथे संपन्न झाली.

वातावरण बदलाचा परिणाम आणि त्यावरील उपाय समजण्यासाठी वालरस प्राणी फिल्म व अमेरिकेतील वनवा या चित्रफिती दाखवण्यात आल्या.



पाणी फाऊंडेशनचे प्रमुख मार्गदर्शक डॉ.अविनाश पोळ साहेब यांनी पोकरा प्रकल्पाच्या संधींबद्दल सखोल मार्गदर्शन केले. जलसंधारण, माती संवर्धन व विना नांगरणी शेती यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास शेती अधिक उत्पादक आणि टिकाऊ होईल, यावर भर देण्यात आला. ठिबक, तुषार सिंचन, फळबाग लागवड, ग्रीन हाऊस, शेड नेट, शितगृह यासारख्या सुविधांचा लाभ घेत शेतकरी समृद्ध होऊ शकतो, याबाबत महत्त्वपूर्ण चर्चा झाली. २२ गावांसाठी विशेष अभ्यास दौऱ्याचे नियोजन करून प्रगतिशील शेतीच्या दिशेने पुढे जाण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

याप्रसंगी डॉ.अविनाश पोळ सर, पुणे बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता श्री.अतुल चव्हाण साहेब, श्री.सांडू आण्णा जाधव, श्री.शिवाजीराव पाथ्रीकर, श्री.सर्जे राव मेटे, श्री.कल्याण दादा चव्हाण, सरपंच समित्या, कृषी सहायक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# क्रांतिवीर लहुजी साळवे यांच्या १४४ व्या स्मृतिदिनानिमित्त सुभद्राबाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने अभिवादन



**लहुजी साळवे चौक, बळीराम पाटील शाळेजवळील क्रांतिवीर लहुजी साळवे यांच्या १४४ व्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.यावेळी प्रा.संजयजी गायकवाड,भाऊसाहेबजी काळुंखे, आढागळे, किशोरजी दणके, राजूजी खाजेकर, संस्थेचे अध्यक्ष रामदास गायकवाड आदी उपस्थित होते.**



**चिंचोली तोळा नाईक तांडा येथे संत शिरोमणी सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली त्यावेळी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख रमेश भाऊ पवार व गावकरी उपस्थित होते.**

# महिला सशक्तीकरणासाठी राज्य सरकारचा महत्वपूर्ण निर्णय..

## राज्यभर उभारले जाणार 'उमेद मॉल'!

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महिला बचतगटांच्या आर्थिक प्रगतीसाठी महाराष्ट्र सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. राज्यात प्रारंभी १० जिल्ह्यांमध्ये हे मॉल्स उभारले जातील आणि नंतर प्रत्येक जिल्ह्यात 'उमेद मॉल' उभारले जाणार असल्याची घोषणा ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी केली आहे. यामुळे महिलांना त्यांच्या उत्पादनांसाठी एक हक्काची आणि कायम स्वरूपी बाजारपेठ उपलब्ध होणार आहे..

सध्या १८ लाख 'लखपती दीदी' कार्यरत असून, मार्चपर्यंत हा आकडा २५ लाखांपर्यंत नेण्याचे राज्य सरकारचे उद्दिष्ट आहे. 'महालक्ष्मी सरस' या उपक्रमाने महिलांना व्यवसायाची मोठी संधी दिली आहे आणि आता 'उमेद मॉल'च्या माध्यमातून त्यांचे उत्पन्न वाढण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

गुजरात आणि मध्य प्रदेशसारख्या राज्यांमध्ये अशा प्रकारचे उपक्रम यशस्वी ठरले आहेत. आता महाराष्ट्रातही 'उमेद मॉल'च्या माध्यमातून महिलांच्या कष्टाला योग्य मूल्य मिळणार आहे. 'महालक्ष्मी सरस' हा उपक्रम यापूर्वी महिलांसाठी लाभदायक ठरला असून, 'उमेद मॉल' ही त्याची पुढची पायरी ठरेल.

ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि राज्य सरकारच्या दूरदृष्टीपूर्ण निर्णयाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन.. महाराष्ट्रातील महिला आता उद्योजकतेच्या नव्या पर्वाकडे वाटचाल करत आहेत. एक आत्मनिर्भर आणि समृद्ध महाराष्ट्र घडवण्याचा हा महत्वपूर्ण टप्पा आहे.

# श्री.वासुपुज्य भगवान जन्मकल्याणक महोत्सव व वार्षिक यात्रा महोत्सवाच्या पत्रिकेचे आचार्य हेमसागरजी महाराज यांच्या हस्ते विमोचन




**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

श्री.१००८ वासुपुज्य दिगंबर जैन अतिशय क्षेत्र बाभुळगांव बु. ता.वैजापुर जि.औरंगाबाद येथे दिनांक २६ फ्रेबुवारी बुधवार रोजी सालाबादाप्रमाणे श्री.वासुपुज्य भगवान जन्मकल्याणक महोत्सव व वार्षिक यात्रा म होत्सवाचे आयोजन सिध्दांत चव्रफ्वर्ती आचार्य हेमसागरजी महाराज यांच्या सानिध्यात संपन्न होणार असुन या कार्यकमाची संपुर्ण माहिती असलेल्या पंचरंगी पत्रिकेचे विमोचन शिवुर येथील त्यागी भवन येथे आचार्य हेमसागरजी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संगस्थ सरिता दिदी,जितेंद्र अजमेरा,पारस झांजरी, ,भरत अजमेरा शांति लाल झाझरी प्रकाश अजमेरा रुतिक अजमेरा व पंचरंगी पत्रिका दाता श्रीमती शकुंतला देवी कासलीवाल सौ शर्मिला मनोज कासलीवाल संगीता कमल कासलीवाल मितल मानव समय सफल कासलीवाल परिवार वाळुज पंढरपुर हे लाभले आहे यावेळी उपस्थित भक्तांना नंदलालजी पांडे यांच्या स्मरणार्थ श्रीमती सुनिता नंदलाजी पांडे सौ योगिता महेंद्र सौ दिपाली निलेश सौ आरती सागर सौ सरिता परेश जैन यश हर्ष रिद्धी आनंदी पवित्रा आशीका पांडे परिवार श्रीरामपूर वाला यांच्यावतीने देण्यात येणार आहे तसेच यावेळी ध्वजारोहण पुनमचंद कलावती जितेंद्र सौ. कल्पना पारस सौ संगीता देवेंद्रकुमार सौ सीमा योगेंद्र कुमार सौ मोनाली संकेत सौ अंकिता पाटणी परिवार बोलठाणा वाला यांच्यावतीने धर्म ध्वजारोहण होणार आहे वतीने देण्यात येणार आहे. इंद्र इंद्राणी म्हणुन सौ.रिना नितीनकुमार अजमेरा नगीना बबनलाल अजमेरा रुतिका निलेश अजमेरा मिताली ईशान नियती अजमेरा शहागज हे राहणार आहे. श्री.१००८ वासुपुज्य दिगंबर जैन अतिशय क्षेत्र बाभुळगांव बु. हे औरंगाबाद नाशिक हायवेवर गारज पासुन ३ कि.मी.अंतरावर आहे. या ठिकाणी दर मंगळवारी शेकडो भाविकांची उपस्थिती दर्शनासाठी राहते. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी पत्रकाव्दारे दिली.

# राष्ट्रीय नमुना पाहणीः कुटुंबांचे आरोग्य सर्व्हेक्षण

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भारत सरकारच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या धर्तीवर 'कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च' या विषयावर राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या पाहणीत राज्यात अर्थ व सांख्यिकी संचालनालय सहभागी होत आहे. या पाहणीमध्ये जानेवारी ते डिसेंबर २०२५ ह्या कालावधीत माहिती गोळा करण्यात येणार आहे.

निवड झालेल्या कुटुंबांकडून मागील ३६५ दिवसांमध्ये कुटुंबाच्या आरोग्यविषयक होणाऱ्या खर्चाबाबत विस्तृत माहिती गोळा करण्यात येत आहे.

या पाहणीचे निष्कर्ष आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा तसेच केंद्र व राज्य शासनाला



नियोजनासाठी व धोरणे राबविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

ही पाहणी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये होत असून या सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश म्हणजे शासकीय आणि खाजगी रुग्णालय/दवाखान्यातून मिळणाऱ्या उपचारांवर होणारा खर्च, कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च, सर्व वयोगटातील लसीकरण, गर्भवती महिलांना मिळणाऱ्या सुविधांचा तपशील इत्यादी बाबींची माहिती गोळा करणे हा आहे.

या सर्वेक्षणाअंतर्गत कुटुंबाची निवड 'एक वर्ष किंवा एक वर्षापेक्षा कमी वयाचे मूल असणारे कुटुंब' आणि 'मागील ३६५ दिवसांमध्ये रुग्णालयाम ध्ये दाखल असणारी कुटुंबातील व्यक्ती' यामधून करण्यात येणार आहे.

नमूना तत्वावर निवडण्यात आलेल्या घटकातील कुटुंबाकडून प्राप्त माहितीवर आधारित निष्कर्ष हे राज्यातील लोकसंख्येकरिता अंदाजित केले जातील.

सर्वेक्षणाकरीता घरी येणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडून कुटुंब निवडीची प्रक्रिया, सर्वे क्षणाची महत्त्वाची माहिती समजून घेण्याची आणि आरोग्यविषयक खर्चासंबंधी योग्य व परिपूर्ण माहिती देण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन जिल्हा सांख्यिकी अधिकारी यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**